## मराठी (प्रथम भाषा) कुमारभारती इयत्ता–दहावी

### ◈ इयत्ता दहावीच्या प्रस्तावित आराखड्यानुसार नमुना कृतिपत्रिका क्र.३

**वेळ– ३ तास** **एकूण गुण–१००**

---

### कृतिपत्रिकेसाठी सूचना

(१) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

(२) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(३) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

(४) विभाग ५– उपयोजित लेखन प्र.५ (अ) (२) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र.१ (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

(५) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

### विभाग १ गद्य

**पठित गद्य**

**प्र. १. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) वैशिष्ट्ये लिहा.** ०१

(i) **वसंतऋतूचा स्पर्श**

↓ ...... ↓ ......

(ii) **खालील वाक्यांच्या साहाय्याने गवताचे पाते आणि पिकलेले पान यांच्या वृत्तीतील फरक स्पष्ट करा व तक्ता पूर्ण करा.** ०१

(अ) गोड स्वप्न बघणारे

(आ) स्वत:ला रसिक समजणारे

(इ) कर्णकटू आवाज सहन न होणारे

(ई) स्वत:ला उच्चपदस्थ समजणारे

| गवताचे पाते | पिकलेले पान |
|---|---|
| (i) | (i) |
| (ii) | (ii) |

**(२) चौकटी पूर्ण करा.** ०२

**गवताच्या पात्याचे स्वभाव विशेष**

↓ ......... ↓ ......... ↓ ......... ↓ .........

*हिवाळा नुकताच सुरू झालेला होता.*

*झाडावरून एकामागून एक पिकलेली पाने गळून पडू लागली.*

*पट...पट...पट...*

*त्यांचा तो पट...पट...असा कर्णकटू आवाज...*

*तो आवाज ऐकून धरणीमातेच्या कुशीत झोपी गेलेले एक चिमणे गवताचे पाते जागे झाले. गिरक्या खात खात जमिनीवर येणाऱ्या एका पानाला ते म्हणाले,*

*''पडता पडता किती कटकट करतोयस तू? तुझ्या या दंग्यानं माझ्या साऱ्या गोड गोड स्वप्नांचा चुराडा झाला की!''*

*पानाला राग आला. ते चिडून म्हणाले, ''अरे जा! चिडखोर बिब्बा कुठला! मातीत जन्मून मातीतच लोळणाऱ्या तुझ्यासारख्या क्षुद्र गवताच्या पात्याला आमच्या या उच्च वातावरणाची कल्पना कशी येणार? हा दंगा नाही, बेटा! हे गाणं चाललंय! जन्मात कधी आ न करणाऱ्या तुझ्यासारख्या अरसिकाला ते समजायचं नाही!'' हे बोलता बोलताच ते पान पृथ्वीवर पडले आणि धरणीमातेच्या कुशीत झोपी गेले.*

*ते पुन्हा जागे झाले, ते वसंताच्या संजीवक स्पर्शाने! त्या स्पर्शात विलक्षण जादू होती. त्या जादूने आता त्या पानाचे रूपांतर गवताच्या चिमुकल्या पात्यात झाले होते. पुन्हा हिवाळा आला. थंडीने कुडकुडत गवताचे पाते धरणीमातेच्या कुशीत लपू लागले-झोपू लागले. पण पुन:पुन्हा त्याची झोपमोड होऊ लागली. जिकडे तिकडे झाडांवर पाने सळसळत होती...पट पट असा आवाज करीत पृथ्वीवर पडत होती!*

*ते गवताचे पाते कपाळाला आठी घालून स्वत:शीच पुटपुटले, 'काय ही हिवाळ्यातली पानं! जीव खाऊन टाकला यांनी अगदी! केवढा हा कर्णकटू आवाज...छी छी छी! माझ्या साऱ्या गोड गोड स्वप्नांचा चेंदामेंदा केला यांनी!'*

**(३) व्याकरण** ०१

(i) **अधोरेखित शब्दांची जात ओळखा.**

(अ) धरणीमातेच्या कुशीत झोपी गेलेले एक चिमणे गवताचे पाते जागे झाले.

(आ) पिकलेली पाने झाडावरून गळून पडू लागली.

| शब्द | जात |
|---|---|
| ............... | ............... |

(ii) **अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.** ०१

चिंतेने फक्त कपाळावरच्या आठ्या वाढतात.

**(४) स्वमत–** गवताच्या पात्यासारखा स्वभाव असणाऱ्या व्यक्तिबद्दल तुमचे मत लिहा. ०२

प्र. १. (आ) (१) परिणाम लिहा. ०१

(i) अरुणिमाचा ऑक्सिजन साठा संपल्याचा परिणाम ................

(ii) **चुकीचे विधान शोधा.** ०१

अरुणिमाच्या मते········

(अ) प्रयत्न निष्फळ ठरणे म्हणजे अपयश नाही.

(आ) कमकुवत ध्येय म्हणजे अपयश.

(इ) आयुष्यात चांगली व्यक्ती बनणे महत्त्वाचे.

(ई) नशिबापेक्षा कर्तृत्वावर विश्वास ठेवावा.

> आता मी उतरू लागले होते. जेमतेम ४०-५० पावलांवरच माझा ऑक्सिजन साठा संपला...एक सांगू? लक, भाग्य, किस्मत, डेस्टिनी असल्या भाकड शब्दांना मी नाही मानत; पण Fortune favours the braves यावर माझा पूर्ण विश्वास आहे...जेव्हा मी गुदमरू लागले, श्वास घेण्याचा प्रयत्न करू लागले, अगदी त्याच वेळी एका ब्रिटिश माणसाने ओझे होते म्हणून फेकून दिलेला जास्तीचा एक ऑक्सिजन सिलिंडर आम्हांला दिसला. माझ्या शेरपाने तो चटकन मला अडकवला. सावकाश आम्ही त्या 'डेथ झोन'मधून सहीसलामत खाली उतरलो. वर चढण्यापेक्षा खाली उतरताना होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण जास्त आहे...आणि आम्ही ते ओलांडून आलो होतो. 'माझा दिवस' अखेर आला होता...गिर्यारोहकांच्या चढाईच्या टप्प्यातले एक महत्त्वाचे शिखर 'एव्हरेस्ट' मी सर केले होते!
>
> गिर्यारोहणाने मला खूप महत्त्वाचे काही धडे दिले. माझ्यात आत्मविश्वास जागवला. नेतृत्व, गटबांधणी यांचे धडे तर मिळालेच; पण एक पोलादी कणखरपणा माझ्यात निर्माण केला. मित्रांनो, आपण आयुष्यात काय मिळवतो हे महत्त्वाचं नाही, तर ही कमाई आपल्याला अधिक चांगली व्यक्ती कशी बनवते, हे महत्त्वाचं वाटतं मला. आपण इतरांशी कसे वागतो यावरून आपण एक उत्तम व्यक्ती आहोत की नाहीत हे ठरतं.
>
> तुम्हां कुमार वयोगटांतल्या मुलामुलींना एक सांगावंसं वाटतं, की आपलं ध्येय साध्य करताना प्रयत्न निष्फळ ठरणे म्हणजे अपयश नसतं, तर जेव्हा ध्येयच कमकुवत असतं, तेव्हा त्याला अपयश म्हटलं जातं.

**(२) आकृती पूर्ण करा.** ०२

**गिर्यारोहणाने अरुणिमाला प्राप्त झालेल्या गोष्टी**

↓ ...... ↓ ...... ↓ ...... ↓ ......

**(३) व्याकरण** ०१

(i) **सूचनेनुसार कृती करा. अधोरेखित शब्दाचा विरुद्धार्थी शब्द वापरून वाक्य पुन्हा लिहा.**

(अ) प्रयत्न निष्फळ ठरणे म्हणजे <u>अपयश</u> नसतं.

(ii) **खालील तक्ता पूर्ण करा.** ०१

| शब्द | विभक्तीचे नाव |
|---|---|
| (i) माझ्यात | ............... |
| (ii) गिर्यारोहणाने | ............... |

**(४) स्वमत–** अरुणिमाने उताऱ्यात दिलेला संदेश तुमच्या शब्दांत लिहा. ०२

**प्र. १. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) फरक स्पष्ट करा.** ०२

| थकवा | कंटाळा |
|---|---|
| (i) ............... | (i) ............... |
| (ii) ............... | (ii) ............... |

थकणे ही एक शारिरीक अवस्था आहे. थोडी विश्रांती घेतल्यानंतर थकवा जातो. वेगाने चालणाऱ्या व्यक्तीला झाडाच्या सावलीत थांबल्यानंतर प्राणवायूचा लाभ थोडा अधिक होतो व त्याचा थकवा लवकर कमी होतो. प्रत्येक इंद्रियांना मूलभूत शक्ती असते व त्या शक्तीला मर्यादा असते. ती शक्ती ओलांडली म्हणजे थकवा येतो. त्या इंद्रियांना अल्पकाळ विश्रांती मिळाली की बरे वाटते. कंटाळा ही मानसिक अवस्था असते. ते आळसाचेच एक रूप असते. एक प्रकारची जडता, शिथिलता किंवा मंदपणा हे आळसाचे लक्षण असते. आळस हा वृत्तीत रूपांतरित होऊ शकतो. काही व्यक्ती वृत्तीने आळशी असतात. त्यांना कामाचा कंटाळा असतो. ती नाना प्रकारच्या सबबी सांगून कामे टाळतात. हा कंटाळा स्वाभाविक असतो, जेव्हा कामच कंटाळवाणे, रूक्ष, रसहीन व अर्थशून्य असते. लहान मुलांना खेळाचा कंटाळा येत नाही. पण इतर कामांचा कंटाळा येतो. कंटाळा माणसाच्या वृत्तीत असतो. तर थकवा गात्रात असतो. थकवा दूर होऊ शकतो पण कंटाळाही खोड होण्याचा संभव असतो. थकवा किंवा कंटाळा या दोहोंचा एक परिणाम मात्र समान असतो. त्यामुळे हाती घेतलेल्या कामाची प्रत खालावते. अंगचा आळस जाण्यासाठी आणि कर्तृत्वाचा कळस घडण्यासाठी शरीर-मनाचे आरोग्य व ताजेपणा जतन करावे.

**(२) खालील आकृत्या पूर्ण करा.** ०२

(i) **थकवा किंवा कंटाळण्याचा कामावर होणारा परिणाम**

↓

................

(ii) **आळसाचे लक्षण असलेले दुर्गुण**

↓ ↓ ↓

............. ............. .............

**(३) व्याकरण** ०१

(i) **सूचनेनुसार कृती करा.**

(अ) थकणे ही एक शारीरिक अवस्था आहे. (काळ ओळखा.)

(आ) ती शक्ती ओलांडली म्हणजे थकवा येतो. (भविष्यकाळ करा.)

(ii) **'शिथिलता' व 'कंटाळा' या नामांचा उपप्रकार ओळखा.** ०१

| नाम | उपप्रकार |
|---|---|
| (i) शिथिलता | (i) ............... |
| (ii) कंटाळा | (ii) ............... |

**(४) स्वमत–** अंगचा आळस जाण्यासाठी शरीर व मनाचे ताजेपण कसे जपाल ते तुमच्या शब्दांत स्पष्ट करा. ०२

**विभाग २ पद्य**

**प्र. २. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) आकृती पूर्ण करा.** ०२

(i) **कवीने पाखराला करावयास सांगितलेल्या गोष्टी**

↓ ↓ ↓ ↓

........... ........... ........... ...........

आकाशी झेप घे रे पाखरा
सोडी सोन्याचा पिंजरा

तुजभवती वैभव, माया
फळ रसाळ मिळते खाया
सुखलोलुप झाली काया
हा कुठवर वेड्या घेसी आसरा

तुज पंख दिले देवाने
कर विहार सामर्थ्याने
दरि-डोंगर, हिरवी राने
जा ओलांडुनी या सरिता-सागरा

कष्टाविण फळ ना मिळते
तुज कळते परि ना वळते
हृदयात व्यथा ही जळते
का जीव बिचारा होई बावरा

घामातुन मोती फुलले
श्रमदेव घरी अवतरले
घर प्रसन्नतेने नटले
हा योग जीवनी आला साजिरा

**(२) (i) एक किंवा दोन शब्दांत उत्तर द्या.** ०१

(अ) पोपटाचे राहण्याचे ठिकाण-

(आ) पोपटाचे खाद्य-

**(ii) खालील शब्दसमूहाचा अर्थ स्पष्ट करा.** ०१

'तुज कळते परि ना वळते'

**काव्यसौंदर्य** ०२

(३) 'सुखलोलुप झाली काया
हा कुठवर वेड्या घेसी आसरा'' या काव्यपंक्तीतील विचार सौंदर्य स्पष्ट करा.

(४) 'घामातुन मोती फुलले' या विधानाबाबत तुमचा अनुभव लिहा. ०२

**प्र. २. (आ) खालील मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी कृती सोडवा.** ०८

(१) खोद आणखी थोडेसे (२) भरतवाक्य

(१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री (०१) गुण

(२) कवितेचा रचनाप्रकार (०१ गुण)

(३) कवितेचा विषय (०१ गुण)

(४) कवितेतून व्यक्त होणारा भाव (स्थायी भाव) (०१ गुण)

(५) कवितेतील आवडलेली ओळ (०२ गुण)

(६) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे (०२ गुण)

**प्र. २. (इ) खाली दिलेल्या काव्यपंक्तीचे रसग्रहण करा.** ०४

'तू झालास परिस्थितीवर स्वार
आणि घडविलास नवा इतिहास
तू झालास मूक समाजाचा नायक
आणि जागा केलास उभा बहिष्कृत भारत'

## विभाग ३– स्थूलवाचन

**प्र.३. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** ०६

(१) 'मुक्कामामध्ये नियोजनबद्ध प्रवासावर अधिक विश्वास ठेवावा' या लेफ्टनंट स्वाती महाडिक यांच्या विधानाविषयीचे तुमचे विचार स्पष्ट करा.

(२) खालील कृती सोडवा. व्युत्पत्तीकोशाची माहिती यावर परिच्छेद तयार करा.

**व्युत्पत्ती कोश**
- → निर्मितीचा ठराव
- → निर्मितीची जबाबदारी
- → निर्मितीसाठी अर्थसाहाय्य
- → त्याचे प्रकाशन

(३) परिच्छेद तयार करा.
मुले भरकटण्याची कारणे आणि रेखाजींच्या कार्याचा परिणाम

## विभाग ४– भाषाभ्यास

**प्र.४. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

**(१) समास**

खालील तक्ता पूर्ण करा. ०२

| समासाचे नाव | उदाहरण | समास विग्रह |
|---|---|---|
| (i) समाहार द्वंद्व समास | केरकचरा | ...................... |
| (ii) ...................... | प्रतिक्षण | प्रत्येक क्षणाला |
| (iii) द्विगू समास | ...................... | पाच आरत्यांचा समूह |
| (iv) विभक्ती तत्पुरुष समास | ...................... | राजाचा वाडा |

**(२) अलंकार**

खालील वैशिष्ट्यांवरून अलंकार ओळखा व समर्पक उदाहरण द्या. ०२

(i) उपमेय व उपमान या दोघात भेद नाही.

(ii) उपमेय हे उपमानच आहे.

(अ) अलंकाराचे नाव [ ] (आ) अलंकाराचे उदाहरण [ ]

**(३) खालील काव्यपंक्तीतील वृत्त ओळखा.** ०१

'तदितर खग भेणे वेगळाले पळाले
उपवन जल केली जे कराया मिळाले'

**(४) शब्दसिद्धी** ०२

कंसातील शब्दांचे खाली दिलेल्या तक्त्यात वर्गीकरण करा.

(महत्त्व, लुटूलुटू, निकामी, घेईघेई, चढाई, सुकुमार)

| प्रत्ययघटित | उपसर्गघटित | अभ्यस्त |
|---|---|---|
| (i) महत्त्व | ...................... | ...................... |
| (ii) ...................... | ...................... | लुटूलुटू |

**(५) सामान्यरूप तक्ता पूर्ण करा.** ०१

| शब्द | सामान्यरूप |
|---|---|
| (i) धोब्याने | ...................... |
| (ii) शाळेतून | ...................... |

**(६) (i) दिलेल्या वाक्यांत कंसातील वाक्प्रचारांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.** ०१

(तोंडचे पाणी पळणे, मुहूर्तमेढ रोवणे, आकाश ठेंगणे वाटणे)

(अ) १५ ऑगस्टला या वर्षीच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचा प्रारंभ झाला.

(आ) गावात वाघ शिरल्याचे कळताच गावकरी फार घाबरले.

**(ii) तक्ता पूर्ण करा.** ०१

| वाक्प्रचार | अर्थ |
|---|---|
| (i) शिरोधार्य मानणे | (अ) ......................... |
| (ii) ......................... | (आ) लक्षपूर्वक ऐकणे |

**प्र.४. (आ) भाषासौंदर्य.**

(१) **शब्दसंपत्ती**

(१) पुढील शब्दाचे दोन अर्थ लिहा. ०१

[ ] ← **घन** → [ ]

(२) **पुढील शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** ०१

(i) दिशा दाखविणारा ☐

(ii) वाहन चालविणारा ☐

(३) **दिलेल्या शब्दांतून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा. (नगर व पालिका हे दोन शब्द सोडून)** ०१

नगरपालिका- ................ , ................

(४) **गटात न बसणारा शब्द शोधा.** ०१

(i) खाणे, जेवणे, जेवण, करणे ☐

(ii) मधूर, स्वस्त, पाणी, स्वच्छ ☐

(५) **लेखननियमांनुसार लेखन**

(i) **अचूक शब्द ओळखा.** ०१

(अ) उत्स्फुर्त, उत्स्फूत, ऊत्स्फूर्त, उत्स्फूर्त

(आ) सम्मान/संमान/सन्मान/सनमान्

(ii) **खालील वाक्य लेखननियमांनुसार लिहा.** ०१

आणी त्याच क्षणी नवे विचार, नव्या कल्पना माझ्या मनात कारंज्याच्या तूषारांप्रमाणे उडू लागतात.

(६) **विरामचिन्हे**

(i) खाली दिलेल्या उपयोगावरून कोणते विरामचिन्ह वापराल ते चिन्ह लिहा. ०१

(अ) [दोन छोटी वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडण्यासाठी] → ..... (आ) [उत्कट भाव व्यक्त करण्यासाठी] → .....

(ii) खालील वाक्यात योग्य विरामचिन्हे घाला. ०१

तुम्ही खरं सांगत नाही. केस आपोआप काळे राहतात काय

(७) **पारिभाषिक शब्द**

(i) खालील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा. ०१

(अ) Highway ................. (आ) Interview .................


(८) **दिलेल्या सूचनांच्या आधारे खालील शब्दकोडे सोडवा.** ०१

उभे शब्द- ........करी काम

आडवा शब्द- मन मोहित करणारा

(१) (२)

(१)



## विभाग ५ उपयोजित लेखन

**प्र.५. (अ) खालील कृती सोडवा.**

**(१) पत्रलेखन** ०५

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

त्वरा करा! त्वरा करा! त्वरा करा!

विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी!!!

दि.२७ नोव्हें ते २ डिसेंबर

ज्ञानदा प्रकाशन, भंडारा येथे उपलब्ध

सवलतीच्या दरात

**शुद्धलेखन ठेवा खिशात!**

नित्योपयोगी शब्दकोश

(योग्य-अयोग्य लेखन निर्देशांसह)

* खिसा आवृत्ती *

* दि. ३ डिसेंबर रोजी शुद्धलेखन स्पर्धेचे आयोजन व भव्य बक्षीस योजना *

| | | |
|---|---|---|
| विद्यार्थी प्रमुख या नात्याने शाळेसाठी वरील पुस्तकांच्या प्रतींची मागणी करा. | किंवा | शुद्धलेखन स्पर्धेत जिल्ह्यातून प्रथम पारितोषिक मिळवलेल्या मित्रास/मैत्रिणीस अभिनंदनाचे पत्र लिहा. |

**(२) सारांशलेखन** ०५

**विभाग - १ गद्य विभागातील प्र.१ इ मधील अपठित उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

**प्र.५. (आ) (१) बातमीलेखन.**

**आदर्श विद्यालय परभणी येथील शाळेतील 'रूबेला लसीकरणांची बातमी' खालील शब्दांवरून तयार करा.** ०६

- रुबेला लसीकरण
- शालेय स्तरावर स्पर्धा
- भित्तिपत्रक/रांगोळी/चित्रकला
- २० ते २५ नोव्हेंबर
- स्थानिक शासकीय आरोग्यविभाग व आदर्श विद्यालय

**(२) कथालेखन.**

खाली कथेचा पूर्वार्ध दिलेला आहे. कथेचा उत्तरार्ध लिहून कथा पूर्ण करा.


(दिलेली कथा लिहिण्याची गरज नाही) ०६

''आई जावं ना गं कधी तरी फिरायला! किती सारखी कामातच गुंतलेली असते!'' दिवाळीच्या सणाला आलेली समीक्षा आज पुन्हा आईला म्हणत होती. निर्मलाताईंनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. विचारच करत राहिल्या. तेवढ्यात शेजारचे तात्या आले, ''वहिनी गावातल्या सर्व बायकांना ज्येष्ठ नागरिक संघातर्फे परदेश वारी घडवायचा विचार आहे, येता का?'' निर्मलाताई काही बोलायच्या आधी समीक्षाच म्हणाली, ''हो येणार आहे.'' समीक्षाने आपल्या भावाच्या-अविनाशच्या मदतीने लगेचच तिकिट, व्हिसा वगैरे सर्व गोष्टी पूर्ण केल्या. पुढल्याच महिन्यात जाणार होते. सर्व तयारी झाली होती. निर्मलाताई तयार झाल्या होत्या; पण फार मनापासून नाही. आता दोनच दिवस राहिले होते आणि अविनाशचा फोन आला....

**प्र.५. (इ) लेखनकौशल्य**

**खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (१०० ते १२० शब्द)** ०८

**(१) वैचारिक**




**(२) आत्मकथन**

**खालील घटक तुमच्याशी बोलतोय अशी कल्पना करून त्याचे आत्मकथन लिहा.**

